नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 04/06/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## चोरी

1) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 07 कि. मी. अंतरावर विटा इंडस्ट्रीयल(डोलामाईट फॅक्ट्री) मौदी येथे फिर्यादी नामे– संतोष सेवकराम खरोले, वय 33 वर्ष, रा. मौदी हे विटा इंडस्ट्रीयल (डोलामाईट फॅक्ट्री) मौदी येथे मॅनेजर या पदावर आहेत. दिनांक 02/06/2021 चे 18.00 वा. ते दिनांक 03/06/2021 चे 05.30 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने विटा इंडस्ट्रीयल (डोलामाईट फॅक्ट्री) मौदी येथील गोदामाचे शेटरचा ताला तोडुन व त्याचे आतमधुन असलेले स्टोअर रूमचे लाकडी दाराचा ताला तोडुन आत प्रवेश केले. यानंतर आरोपीने स्टोअर रूम मध्ये ठेवलेले मशीनचे जुने स्पेअरपार्ट व इतर साहीत्य असे एकुण किं. 29,500/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पुंजरवाड 8668865203 हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 06 कि. मी. अंतरावर नवेगाव साधु शिवार येथे दिनांक 01/06/2021 चे 12.00 वा. ते दिनांक 02/06/2021 चे 05.00 वा. फिर्यादी नामे– योगेश शामराव आरीकर वय 35 वर्ष रा. नागपुर हे सहायक अभियंता या पदावर कार्यरत असुन दि 02/6/21 रोजी सायं. 08.00 वा. दरम्यान श्री रंजीत ठाकरे (वरिष्ठ तंत्रज्ञान) कार्यक्षेत्र नवेगाव साधु यांनी फोन व्दारे माहीती दिली की, नवेगांव शिवारातील लघुदाब वाहीनी (विदयुत) लाईनचे सिमेन्ट पोल अज्ञात आरोपीने तोडुन त्यावरून 1600 मिटर ॲल्युमिनिअम तार कि. 45,000/– रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा आनंद धात्रक 9545355470 हे करीत आहे.

## मोबाईल चोरी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 0.5 कि. मी. अंतरावर वार्ड क्र. 4, बुटीबोरी येथे दिनांक 01/06/2021 चे 06.00 वा. फियादी नामे– सुनिल संजय शाहु, वय 25 वर्ष, रा. वार्ड नं 04 बुटीबोरी हे रात्री नेहमीप्रमाणे घराचे दार उघडा करून झोपले होते. त्यांनी कि. 14,000/– रू. मोबाईल घरातील फ्रिजवर चार्जींग करीता लावला असता अज्ञात आरोपीने फिर्यादीचा मोबाईल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी चौधरी मो नं 9273237381 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर